RNI No. MAHBIL /2009/31748

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक ४६] शुक्रवार, डिसेंबर ५, २०२५/अग्रहायण १४, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ८२**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

### नगरविकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ डिसेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९.**

क्रमांक एमसीओ-२०२५/प्र.क्र.५३४/नवि-१४.—महाराष्ट्र महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र महानगरपालिका (१९४९ चा महा. ५९) च्या अनुसूची 'ड' मधील महाराष्ट्र महानगरपालिका निवडणूक नियमांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट वाटते;

आणि ज्याअर्थी, याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यासाठी या नियमांची पूर्वप्रसिध्दीची शर्त काढून टाकणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा महा. ५९) कलम ४५६अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि यासंदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयुक्तांशी विचारविनिमय करून, अनुसूची 'ड' मधील महाराष्ट्र महानगरपालिका निवडणूक नियमांमध्ये आणखी सुधारणा करुन, याद्वारे पुढील नियम तयार करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका अनुसूची 'ड' मधील निवडणूक (सुधारणा) नियम, २०२५ असे म्हणण्यात येईल.

२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा महा. ५९) च्या अनुसूची 'ड' मधील महाराष्ट्र महानगरपालिका निवडणूक नियमांच्या नियम ११ मध्ये, उप-नियम (३) ऐवजी, खालील उप-नियम समाविष्ट करण्यात येत आहे :—

"(३) (*i*) निवडणूक चिन्ह नेमून दिल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवारांची नावे खालील पध्दतीने दर्शवून उमेदवारांची यादी प्रसिध्द करेल :—

(अ) पहिला गट.—भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे असे मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांचे उमेदवार.

(ब) दुसरा गट.—भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांचे उमेदवार.

(क) तिसरा गट.—राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे उमेदवार.

(ड) चौथा गट.—अपक्ष उमेदवार

(*ii*) वरीलप्रमाणे प्रत्येक गटातील उमेदवारांचा क्रम लावताना तो मराठी भाषेतील वर्णानुक्रमानुसार लावण्यात यावा. उमेदवारांचा क्रम लावताना प्रथम त्यांचे आडनांव (आडनाव नसल्यास नांव), त्यानंतर नांव व त्यानंतर पत्ता विचारात घ्यावा.”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रियांका कुलकर्णी-छापवाले,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 5th December, 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949.

No.MCO-2025/C.R.534/UD-14.-Whereas, it is expedient further to amend the Maharashtra Municipal Corporations Election Rules in SCHEDULE ‘ D ’ of the Maharashtra Municipal Corporations (LIX of 1949) for the purpose of conduct of election of Municipal Corporations;

And Whereas the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to take immediate action; and for that purpose to dispense with the condition of previous publication thereof;

Now, therefore, in exercise of the powers conferred by section 456A of the Maharashtra Municipal Corporations Act (LIX of 1949) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby, in consultation with the State Election Commissioner, makes the following rules further to amend Maharashtra Municipal Corporations Election Rules in SCHEDULE ‘ D ’ of the said Act, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Municipal Corporations Election Rules in SCHEDULE ‘ D ’ (Amendment) Rules, 2025.

2. In rule 11 of the Maharashtra Municipal Corporations Election Rules in SCHEDULE ‘ D ’ of the Maharashtra Municipal Corporations Act (LIX of 1949), for sub-rule (3), the following sub-rule shall be substituted, namely :—

“(*3*) (*i*) After allocation of symbols, the Returning Officer shall publish a list of the contesting candidates by arranging the names of candidates in the following order,—

(*a*) First Group.—Candidates of the National Parties and the State- level Parties in Maharashtra recognised by the Election Commission of India and registered with the State Election Commission.

(*b*) Second Group.—Candidates of State-level Parties of other States recognised by the Election Commission of India and registered with the State Election Commission.

(*c*) Third Group.—Candidates of unrecognized political parties registered with the State Election Commission.

(*d*) Fourth Group.—Independent Candidates.

(*ii*) The names of candidates in each of the above groups shall be arranged in alphabetical order in Marathi beginning with the surnames (in respect of candidates having surnames) followed by their names and addresses as stated in the nomination papers.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRIYANKA KULKARNI-CHHAPWALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.